पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक :नस/४/कावि/११/२०२१
दिनांक : ०७/०१/२०२१

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दि.**१५/०१/२०२१** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१५/०१/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.विधी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ०५**

**दिनांक : १५/०१/२०२१** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची **पाक्षिक** सभा **शुक्रवार,** दिनांक **१५/०१/२०२१** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक १८/१२/२०२० व ०१/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक **०३** ) चा सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक ०१/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०४) चा सभावृत्तांत कायम करणे.

-----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर '**चिफ केमिस्ट**' अभिनामाचे **१** पद **र.रु १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** मध्ये शासन मंजूर असून सदरचे पद रिक्त आहे. प्रस्तुतच्या पदाकरीता शासन निर्णयाप्रमाणे निर्धारीत केलेली अर्हता पुढीलप्रमाणे :- महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार पुढीलप्रमाणे, **पदोन्नतीने १००% -** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील केमिस्ट या पदावरील किमान ३वर्ष सेवा पुर्ण झालेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. **'चिफ केमिस्ट'**रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्तसो यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक ०२/११/२०२० रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व '**चिफ केमिस्ट**' पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्च, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, **श्री.जगताप प्रशांत अरुण, केमिस्ट** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञायाचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून '**चिफ केमिस्ट**' पदावर **र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार शासन मंजूरीच्या अधिन तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस

केली आहे. सबब, **श्री.जगताप प्रशांत अरुण** यांना **र.रु १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार)** मध्ये '**चिफ केमिस्ट**' पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गाच्या रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १५/०१/२०२१ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)**

विषय क्र.२) मे.ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यास कामाचे आदेश निर्गत (निविदा दर ५.८६% कमी) करणेत आलेले आहे. सदर कामासाठी मे. शशि प्रभु असो. यांची सल्लागार म्हणून नेमणुक करणेत आलेली आहे. सद्यास्थितीत सदर ठिकाणचे काम चालु आहे.पिंपरी प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालयासाठी नवीन इमारत बांधणे हे काम यापुर्वी निविदा शेड्ुल मधील सर्व बाबींचे निविदा रक्कम या मर्यादेत पुर्ण झाले असुन सदर इमारत वैद्यकिय विभागाकडे हंस्तांतरीत करणेत आली आहे. तसेच सदर कामाचे अंतीम बील तयार करणेत आले असुन अदायगीसाठी लेखा विभागाकडे सादर केलेले आहे. कोरोना कोवीड– १९ मुळे प्रतिबंधक उपाय म्हणुन रुग्णालयात १०० बेडची व्यवस्थापनाचे काम मा. आयुक्त साहेब व मा. वैद्यकिय अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे काम सुरु केले आहे. सदरच्या सुचने मध्ये जिजामाता रुग्णालय येथील डॉक्टर (वैद्यकिय अधिकारी) निवासस्थानासाठी विद्युत व्यावस्था करणेचे व रुग्णालयाकरीता एक्सप्रेस फिडर द्वारे अखंडीत वीजपुरवठा करणेकामी मराविवि कंपनी व विद्युत विभागाचे सहशहर अभियंता विद्युत/ यांत्रिकी यांचे समवेत याबाबत चर्चा होऊन रिंग मेन युनिट बसवुन केबल चार्ज करुन एक्सप्रेस फिडर द्वारे वीज पुरवठा करणे बाबत सुचना व आदेश देण्यात आले व त्या कामावर झालेला खर्च रक्कम रु ८२,५५,०००/-थेरगाव येथील चालु असलेल्या रुग्णालयाच्या कामातअतिरिक्त बाब (Extra Item)म्हणुन समावेश करुनमे. ईगल इंन्फ्रा इंडिया लि. यांना अदा करणेत यावा असा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांनी दि. १३/५/२०२० च्या प्रस्तावानुसार मंजुर केला आहे व त्या खर्चास जागेत बदल होत असल्याने मा.विधि समितीची मान्यता घेणेची आवश्यकता आहे. त्यास अनुसरुन संबधीत ठेकेदारांने काम सुरु केले आहे. वर नमुद केल्या प्रमाणे मुळ चालु असलेल्या कामाच्या जागेत बदल होत असल्याने यांस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) प्रभागक्र. १६(नवीनप्र.क्र.१४) मधील आकुर्डी रुग्णालयचे विस्तारी करण करणे टप्पा– १ व २ अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे याकामाचे आदेश निविदा नोटीस क्र.१– ७७/१/२०१६-१७, निविदा नोटीस क्र.२– ५३/२/२०१८-१९ मे.एस.एस.साठे ( टप्पा१) व मे.स्पिड फोर्स्ट यास निविदा स्विकृत दराने निर्गत करणेत आले असुन याकामासाठी सल्लागार म्हणुन मे.शशिप्रभु असो. यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. याकामातुन ऑटोक्लस्टर येथे खालील प्रकारची कामे निविदा खर्च यामर्यादीत करणे शक्य आहे. कोविड– १९

रुग्णालयाचे कामतातडीने करणे आवश्यक असल्याने चालु निविदा कामातुन करणे बाबत मा.आयुक्त साहेब यांनी सुचना केल्यानुसार कामकाज करणेत आले आहे.

**मुळ निविदा क्र. – क्र.१) ७७/१/२०१६-१७,** **मुळ निविदा क्र.२) ५३/२/२०१८-१९**
**मुळ निविदा रक्कम– ९,७१,९२,१७३/- ,** **मुळ निविदा रक्कम– ३,३७,४८,०४९/-**
**मुळ कामाचे ठिकाण– आकुर्डी रुग्णालय,** **आकुर्डी रुग्णालय**
**बदल करावयाचे ठिकाण– ऑटोक्लस्टर चिंचवड, ऑटोक्लस्टर चिंचवड**
**बदल केलेल्या ठिकाणी करावयाच्या कामाची १) र.रु. १,४५,२६,२२९/-, २) र.रु.४५,५१,४६६/-** कोविड– १९ महामारीचे शहरातील वाढते प्रमाण लक्षात घेता मनपाने ऑटोक्लस्टर येथील हॉल A व B मध्ये जम्बो रुग्णालय तयार करणे तसेच हॉल B मध्ये ICU तयार करणेचे नियोजन करणेत आलेले आहे. त्याअंतर्गत सदर हॉलची प्रत्यक्ष पाहणी केली असुन रुग्णालयमधील अत्यावश्यक वैद्यकिय सुविधा देणेकरीता आवश्यक विद्युत व्यवस्था करणेकामाचे निविदा प्रसिध्द करणेत आली असुन आदेश देणेची कार्यवाही प्रगती पथावर आहे, तथापि प्रत्यक्ष ठिकाणी कामकाज सुरू करण्यात आले आहे. हॉल B मध्ये ICU चे ५० बेड तयार करण्याचे नियोजन असलेने सदर हॉल मध्ये वातानुकूलित यंत्रणा आवश्यक असल्याने तोंडी कळविण्यात आले आहे. सदर ठिकाणी प्रदर्शना करिता आवश्यक असलेली वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वीत आहे. तथापि रुग्णालयातील ICU च्या दृष्टीने आवश्यक वातानुकूलित यंत्रणा बसविण्याकरिता, आहे त्यायंत्रणेमध्ये काही बदल करुन (Modification) सदरची वातानुकूलित यंत्रणा वापरणेत येईल. परंतु अशा प्रकारचे असलेने करण्यास कालावधी लागणार आहे. तसेच बदल करावे लागणारे काम हे विशीष्ट प्रकारचे असलेने सदर कामाचे दर शासकीय दर सुचीमध्ये उपलब्ध नाहीत त्याकरीता बाजारातुन दर मागवून अंदाजपत्रक तयार करुन निविदामागवून कामकाज करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता व सदरचे कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम उपरोक्त विषयांकित कामातुन करणेस मा. आयुक्त मंजुर टिपणी दि. १०/०८/२०२० अन्वये मान्यता मिळालेली आहे. परंतु सदरचे कामाच्या ठिकाणात बदल झाला असल्याने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

----------

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११/२०२१
दिनांक : ०७/०१/२०२१ चे लगत.